
Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शनिवार, दि. १ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ । अंक ११४ । पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

**पहाण गावात पावसाच्या पुरामुळे ग्रामस्थ वेढले!**
(पान २ वर)



Selected

### पावसाचे पाणी साचल्याने कुंभारवाडा परिसर जलमय

**नाशीरबाद:** शहरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, पोलिस स्टेशनजवळील पाण्याची टाकी आणि कुंभारवाडा परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. पावसाचे पाणी तुंबल्यामुळे या भागातील रस्त्यांना जलमय स्वरूप आले असून ये-जा करताना वाहनचालक आणि नागरिकांना प्रचंड कसरत करावी लागत आहे. साचलेल्या पाण्यामुळे शाळकरी मुले, वृद्ध तसेच कामावर जाणाऱ्या नागरिकांचे मोठे हाल होत आहेत. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, योग्य पाण्याचा निचरा न झाल्यामुळे प्रत्येक पावसाळ्यात या भागात अशीच बिकट परिस्थिती निर्माण होते. प्रशासनाने तातडीने या समस्येची दखल घेऊन साचलेल्या पाण्याचा निचरा करावा आणि पाणी तुंबण्याची ही समस्या दूर करण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

## जंतर-मंतर आंदोलनानंतर आंदोलक विद्यार्थ्यांबाबत पंतप्रधान मोदींचा भावनिक संदेश

# ‘मला त्यांना माफ करायचंय’;- पंतप्रधान नरेंद्र मोदी

## शिवीगाळ करणाऱ्या आंदोलकांबाबत कठोर कारवाईऐवजी सुधारण्याची संधी द्यावी

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली । जंतर-मंतरवरील आंदोलनादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या कुटुंबीयांविरोधात कथितरित्या आक्षेपार्ह भाषा वापरल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी रात्री प्रसिद्ध केलेल्या व्हिडिओ संदेशातून आंदोलक विद्यार्थ्यांना माफ करण्याची भूमिका जाहीर केली.**

कठोर शिक्षेपेक्षा त्यांना योग्य दिशा दाखविण्याची गरज असल्याचे सांगत, “मला त्यांना माफ करायचंय,” असे मोदी म्हणाले. व्हिडिओ संदेशात मोदी म्हणाले की, जंतर-मंतरवर घडलेला प्रकार संपूर्ण देशाने आणि जगाने पाहिला. काही आंदोलनकर्त्यांनी अत्यंत आक्षेपार्ह भाषा वापरली, ज्यामध्ये त्यांच्या दिवंगत आईबाबतही अवमानास्पद वक्तव्ये करण्यात आली. ही भाषा कोणत्याही सभ्य समाजाला शोभणारी नसल्याचे त्यांनी नमूद केले. तथापि, संताप व्यक्त करण्याऐवजी मोदींनी संयमाची भूमिका घेतली. “लहानपणी चुका होतात आणि त्या चुकांमधून सुधारण्याची संधीही मिळाली



पाहिजे. ही दिशा भरकटलेली मुलं आहेत. त्यांना योग्य मार्ग दाखवणं हे समाजाचं कर्तव्य आहे,” असे ते म्हणाले. त्यांनी पुढे सांगितले की, अशा विद्यार्थ्यांवर केवळ गुन्हे दाखल करून किंवा न्यायालयीन प्रक्रियेत अडकवून परिस्थिती सुधारत नाही. त्याऐवजी त्यांना समजावून सांगणे, प्रेमाने स्वीकारणे आणि योग्य मूल्यांची जाणीव करून देणे अधिक महत्त्वाचे आहे. “समाजानेही माझी ही भूमिका समजून घ्यावी,” असे आवाहन त्यांनी केले. यावेळी मोदींनी एक प्रतीकात्मक उदाहरण देत सांगितले, “कधी कधी आपल्याच दाताखाली आपली जीभ येते आणि रक्त येतं. पण आपण दात तोडत नाही, कारण दातही आपलेच आणि जीभही आपलीच असते. त्याचप्रमाणे ही मुलंही आपलीच आहेत. काही आंदोलनकर्त्यांनी अत्यंत आक्षेपार्ह भाषा वापरली, ज्यामध्ये त्यांच्या दिवंगत आईबाबतही अवमानास्पद वक्तव्ये करण्यात आली. ही भाषा कोणत्याही सभ्य समाजाला शोभणारी नसल्याचे त्यांनी नमूद केले. तथापि, संताप व्यक्त करण्याऐवजी मोदींनी संयमाची भूमिका घेतली. “लहानपणी चुका होतात आणि त्या चुकांमधून सुधारण्याची संधीही मिळाली पाहिजे. त्यांना योग्य दिशा देणं हीच खरी जबाबदारी आहे.” देशातील युवकांना उद्देशून त्यांनी सकारात्मक संदेश दिला. “चुकांमधून शिका, नवीन गोष्टी आत्मसात करा आणि देशाच्या प्रगतीत सहभागी व्हा. माझं स्वप्न तुमच्या उज्वल भविष्यासाठी आहे. आपण सर्वांनी मिळून देशाला अधिक सक्षम बनवूया,” असे आवाहन त्यांनी केले.

### भावनिक संदेश न देता स्पष्ट भूमिका घ्यावी

दरम्यान, या व्हिडिओ संदेशानंतर आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी प्रतिक्रिया देत पंतप्रधानांवर टीका केली. आंदोलक विद्यार्थ्यांवर दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांचा उल्लेख करत त्यांनी पंतप्रधानांनी केवळ भावनिक संदेश न देता त्या प्रकरणांवरही स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी केली. तसेच सोशल मीडियावरील टीका, मीम्स आणि विनोदांबाबत सरकारने अधिक सहिष्णु भूमिका घ्यावी, असेही त्यांनी म्हटले. पंतप्रधानांच्या या संदेशामुळे राजकीय आणि सामाजिक स्तरावर विविध प्रतिक्रिया उमटत असून, विद्यार्थ्यांवरील कारवाई आणि आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पुढील घडामोडींकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

## कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये भारताची दमदार मुसंडी

### प्रिती पवारची फायनलमध्ये धडक



**जन सम्राट टाईम्स**

**नशिराबाद | प्रतिनिधी:** ग्लास्गो येथे सुरू असलेल्या कॉमनवेल्थ गेम्स २०२६ मध्ये भारताच्या युवा महिला बॉक्सिंगपटू प्रिती पवार हिने शानदार कामगिरी करत देशाचा अभिमान उंचावला आहे. महिला ५४ किलो वजनी गटाच्या उपांत्य फेरीत प्रतिस्पर्ध्यावर प्रभावी मात करत तिने अंतिम फेरीत धडक मारली असून भारतासाठी किमान रजत पदक निश्चित केले आहे. उपांत्य फेरीतील तिच्या आत्मविश्वासपूर्ण खेळीने भारतीय क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधून घेतले. संपूर्ण सामन्यात आक्रमक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम खेळाचे प्रदर्शन करत प्रितीने विजय मिळवला. या विजयामुळे भारताच्या पदकतालिकेत आणखी एका पदकाची भर पडणार असून, आता सर्वांच्या नजरा तिच्या अंतिम सामन्याकडे लागल्या आहेत. प्रिती पवारने सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि उत्कृष्ट तांत्रिक कौशल्याच्या जोरावर अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. तिच्या या यशामुळे भारतीय महिला बॉक्सिंगला नवी उभारी मिळाली असून युवा खेळाडूंनाही प्रेरणा मिळत आहे. आता अंतिम सामन्यात विजय मिळवत सुवर्णपदकावर नाव कोरण्याचे मोठे आव्हान तिच्यासमोर आहे. देशभरातील क्रीडाप्रेमी, प्रशिक्षक आणि चाहत्यांकडून प्रितीवर शुभेच्छांचा वर्षाव होत असून, ती भारतासाठी सुवर्णपदक जिंकून इतिहास रचेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. प्रितीच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे कॉमनवेल्थ गेम्समध्ये भारताच्या पदकसंख्येत वाढ होण्याची आशा अधिक बळकट झाली आहे. तिच्या जिद्दीच्या आणि संघर्षमय प्रवासाच्या जोरावर भारतीय तिरंगा सर्वोच्च स्थानी फडकवण्याची संधी आता अंतिम सामन्यात असेल.

## अशोक सूर्यवंशी यांना 'जगद्गुरू संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार'

### शिक्षण, समाजसेवा, पत्रकारिता आणि ग्रामीण जनजागृतीतील उल्लेखनीय कार्याचा गौरव

**जन सम्राट टाईम्स**

**अहिल्यानगर| प्रतिनिधी :** आषाढी एकादशी आणि राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त आयोजित 'जगद्गुरू संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय ७ वे ग्रामीण मराठी साहित्य संमेलन – २०२६' व राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात मिरजगाव येथील नूतन मराठी प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. अशोक विश्वनाथ सूर्यवंशी यांना प्रतिष्ठेचा 'जगद्गुरू संत तुकाराम महाराज राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. दि. २५ जुलै २०२६ रोजी निमगाव वाघा (ता. जि. अहिल्यानगर) येथे हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी खासदार निलेश लंके, उद्योगपती माधवराव लामखडे, साहित्यिक सीए डॉ. प्रा. शंकर अवंतरी, ॲड. आनंद सूर्यवंशी तसेच अन्य मान्यवरांच्या हस्ते श्री. सूर्यवंशी यांना सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले. श्री. अशोक



सूर्यवंशी यांनी शिक्षण क्षेत्रात विद्यार्थीकेंद्रित उपक्रम राबवित ग्रामीण भागातील शैक्षणिक विकासासाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे. समाजसेवा, पत्रकारिता, सांस्कृतिक चळवळी, विद्यार्थी विकास, शैक्षणिक जनजागृती आणि विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांनी सातत्याने सक्रिय सहभाग नोंदविला आहे. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत त्यांना हा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. विशेष म्हणजे, यापूर्वीही श्री. सूर्यवंशी यांना विविध क्षेत्रांतील उत्कृष्ट कार्याबद्दल सात राज्यस्तरीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून, हा त्यांचा आठवा राज्यस्तरीय सन्मान ठरला आहे. त्यामुळे मिरजगावसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या कार्याचा सर्वत्र गौरव होत आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक संघटना, पत्रकार संघ, शिक्षक, मित्रपरिवार, ग्रामस्थ, विद्यार्थी आणि पालकांनी श्री. अशोक सूर्यवंशी यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे. ग्रामीण शिक्षणाच्या उन्नतीसाठी आणि समाजहिताच्या कार्यासाठी त्यांचे योगदान भविष्यातही प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## पूरग्रस्तांना तातडीने रेशन धान्याचा दिलासा

**जन सम्राट टाईम्स**

**धुळे ग्रामीण । प्रतिनिधी:** धुळे तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे नदीकाठच्या अनेक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली असून, अनेक घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. संसारोपयोगी साहित्याबरोबरच अन्नधान्यही पाण्यात भिजून खराब झाले असून काही ठिकाणी वाहून गेले आहे. या पार्श्वभूमीवर पूरग्रस्त कुटुंबांना विशेष बाब म्हणून तातडीने रेशनचे धान्य उपलब्ध करून देण्याचे निर्देश देण्यात आल्याची माहिती धुळे ग्रामीणचे आमदार राघवेंद्र (रामदादा) पाटील यांनी दिली.



पूरस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन आमदार रामदादा पाटील यांनी अंबोडे गावासह पूरग्रस्त भागांना भेट देत परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. नदीकाठावरील बाधित परिसरात जाऊन त्यांनी ग्रामस्थ व शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि शासन व प्रशासन त्यांच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचा विश्वास दिला. अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे, घरांचे आणि मालमत्तेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे यावेळी निदर्शनास आले. अनेक कुटुंबांचे अन्नधान्य पूर्णपणे भिजल्याने त्यांच्यासमोर उपजीविकेचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे अशा सर्व कुटुंबांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत तातडीने रेशन धान्य उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. यावेळी आमदार पाटील यांनी प्रशासनाला नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे तातडीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. बाधित शेतकऱ्यांना शासनाकडून योग्य व तातडीची आर्थिक मदत मिळावी यासाठी आपण स्वतः पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. पाहणी दौऱ्यावेळी तहसीलदार अरुण शेवाळे, पोलिस निरीक्षक धनंजय पाटील, माजी कृषी सभापती प्रा. अरविंद जाधव, एसडीआरएफची आपत्कालीन मदत टीम तसेच स्थानिक ग्रामस्थ उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी पूरस्थितीचा आढावा घेत नागरिकांना आवश्यक ती मदत आणि सुरक्षिततेच्या उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, हवामान विभागाने पुढील काही दिवस जोरदार पावसाचा इशारा दिल्याने नागरिकांनी नदी-नाल्यांच्या काठावर जाणे टाळावे.

## पत्रकारांच्या मागण्यांवर केंद्र सरकार सकारात्मक

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** देशभरातील पत्रकारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी व्हॉईस ऑफ मीडिया (VOM) इंटरनॅशनल फोरमच्या वतीने राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या बेमुदत उपोषणाला अखेर यश मिळाले. केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे आणि केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या मध्यस्थीने झालेल्या सकारात्मक चर्चेनंतर केंद्र सरकारने पत्रकारांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक तथा आंतरराष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी उपोषण मागे घेत असल्याची घोषणा केली. पत्रकार सुरक्षा कायदा, पत्रकारांना सामाजिक सुरक्षा, आरोग्य विमा, निवृत्तीवेतन, पत्रकार कल्याणकारी योजना, पत्रकारांच्या कुटुंबीयांसाठी शैक्षणिक सुविधा, डिजिटल माध्यमांतील पत्रकारांना अधिकृत मान्यता तसेच पत्रकारितेच्या स्वातंत्र्याच्या संरक्षणासह विविध मागण्यांसाठी हे आंदोलन उभारण्यात आले होते. देशभरातील विविध राज्यांतील पत्रकारांनी या आंदोलनात उत्स्फूर्त सहभाग नोंदवत केंद्र सरकारचे लक्ष या महत्त्वाच्या प्रश्नांकडे वेधले. आंदोलनाची दखल घेत केंद्रीय युवक व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी पत्रकार प्रतिनिधींना चर्चेसाठी निमंत्रित केले. या बैठकीत पत्रकारांच्या विविध मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली. पत्रकारांचे प्रश्न हे केवळ एखाद्या राज्यापुरते मर्यादित नसून संपूर्ण देशातील माध्यम क्षेत्राशी संबंधित असल्याचे प्रतिनिधींनी स्पष्ट केले. यावेळी रक्षा खडसे यांनी पत्रकारांच्या मागण्यांबाबत केंद्र सरकार गंभीर आणि सकारात्मक असल्याचे सांगितले. संबंधित मंत्रालयांशी समन्वय साधून पत्रकारांच्या प्रश्नांवर आवश्यक प्रशासकीय कार्यवाही



केली जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकार अत्यंत जबाबदारीने कार्य करतात आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांचा सरकार सकारात्मक विचार करेल, असेही त्यांनी नमूद केले. त्यानंतर केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनीही आंदोलनस्थळी भेट देत पत्रकारांशी संवाद साधला. पत्रकारांच्या प्रश्नांबाबत केंद्र सरकार संवेदनशील असून संबंधित मंत्रालयांकडे प्रभावी पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. सरकारशी सकारात्मक संवाद कायम ठेवत आंदोलन मागे घ्यावे, अशी विनंतीही त्यांनी केली. दोन्ही केंद्रीय मंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनानंतर व्हॉईस ऑफ मीडिया आणि व्हीओएम इंटरनॅशनल फोरमच्या पदाधिकाऱ्यांनी परस्पर चर्चा करून बेमुदत उपोषण मागे घेण्याचा निर्णय जाहीर केला. मात्र, सरकारने दिलेल्या आश्वासनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईपर्यंत पत्रकारांच्या मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवण्यात येईल, असे संघटनेने स्पष्ट केले. रक्षा खडसे यांच्यासोबत झालेल्या बैठकीस व्हॉईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल म्हस्के,राज्य कोअर कमिटी सदस्य कल्पेश महाले आणि महाराष्ट्र राज्य प्रसिद्धी प्रमुख बापुराव ठाकरे उपस्थित होते. तसेच आंदोलनस्थळी देशातील विविध राज्यांतील पत्रकार, संघटनेचे पदाधिकारी आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उपोषण मागे घेतल्यानंतर व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय मंत्री रक्षा खडसे आणि प्रतापराव जाधव यांचे आभार व्यक्त केले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# अंजनी धरणातून 5,500 क्युसेक्स पाण्याचा विसर्ग सुरु

## नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे :पालकमंत्री गुलाबराव पाटील

**जन सम्राट टाईम्स**

**जळगाव | प्रतिनिधी:** जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अंजनी मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाण्याची आवक वाढत असून धरणातील जलपातळी झपाट्याने वाढत आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या निर्देशानुसार अंजनी धरणातून ५,५०० क्युसेक्स पाण्याचा नियंत्रित विसर्ग नदीपात्रात सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी अत्यंत सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. पालकमंत्री गुलाबराव पाटील



यांनी नागरिकांना कोणत्याही परिस्थितीत नदीपात्रात उतरू नये, पूरस्थिती पाहण्यासाठी नदीकाठावर गर्दी करू नये आणि प्रशासनाच्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे कळकळीचे आवाहन केले आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

नदीकाठावरील शेतकरी आणि ग्रामस्थांनी आपल्या गुरेढोरे, पशुधन, शेतीतील मोटारपंप, कृषी अवजारे तसेच इतर मौल्यवान साहित्य तातडीने सुरक्षित ठिकाणी हलवावे, असेही आवाहन करण्यात आले आहे. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांनी त्वरित स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, नदीपात्रालगत सुरू असलेली विविध विभागांची बांधकामे, यंत्रसामग्री आणि साहित्य सुरक्षित स्थळी हलविण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत. सर्व शासकीय यंत्रणांनी सतर्क राहून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवावे, आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवाव्यात आणि आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेशी समन्वय राखावा, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले आहेत.

गिरणा पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता विनोद पाटील यांनी सांगितले की, धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पावसाची तीव्रता आणि पाण्याची आवक लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार पाण्याच्या विसर्गात वाढ किंवा घट करण्यात येईल. त्यामुळे नदीकाठच्या गावांतील नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांवरच विश्वास ठेवावा, असे आवाहनही करण्यात आले आहे. प्रशासनाने नागरिकांना विनाकारण नदी, नाले किंवा पूरग्रस्त भागात जाणे टाळण्याचे आवाहन केले असून, सतर्कता आणि सहकार्य याद्वारे कोणतीही जीवित किंवा वित्तहानी टाळता येईल, असा विश्वास व्यक्त केला आहे.

### सूचनांचे काटेकोर पालन करावे

पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी नागरिकांना कोणत्याही परिस्थितीत नदीपात्रात उतरू नये, पूरस्थिती पाहण्यासाठी नदीकाठावर गर्दी करू नये आणि प्रशासनाच्या सर्व सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे कळकळीचे आवाहन केले आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी प्रत्येकाने जबाबदारीने वागणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# अतिवृष्टीचा पारोळा तालुक्याला तडाखा: अनेक गावांत पूरस्थिती, शेती व जनावरांचे नुकसान!

## आठ गावांमध्ये पाणी शिरले; जनजीवन विस्कळीत –पंचनामे व मदतीची मागणी

जन सम्राट टाईम्स



**पारोळा|** दि. ३१ जुलै २०२६ रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे पारोळा तालुक्याला अतिवृष्टीचा जबरदस्त फटका बसला आहे. सततच्या पावसामुळे नद्या व नाल्यांना आलेल्या पुरामुळे अनेक गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाली असून घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेती, जनावरे आणि पायाभूत सुविधांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. तालुक्यातील तामसवाडी, देवगाव, चोरवड, भोंडण टोळी, तरडी, उंदीरखेडे, मोंढाळे आणि मुंदाणे शिरसमणी या गावांना पुराचा सर्वाधिक फटका बसला. नदीकाठच्या परिसरात पुराचे पाणी शिरल्याने अनेक घरांमध्ये पाणी घुसले आणि संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले. काही कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याची वेळ आली.

अतिवृष्टीमुळे काही ठिकाणी बकऱ्या, म्हशी आणि इतर जनावरे पुराच्या पाण्यात वाहून गेल्याच्या घटनाही घडल्या आहेत. शेती, जनावरे आणि पायाभूत सुविधांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. तालुक्यातील तामसवाडी, देवगाव, चोरवड, भोंडण टोळी, तरडी, उंदीरखेडे, मोंढाळे आणि मुंदाणे शिरसमणी या गावांना पुराचा सर्वाधिक फटका बसला. नदीकाठच्या परिसरात पुराचे पाणी शिरल्याने अनेक घरांमध्ये पाणी घुसले आणि संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले. काही कुटुंबांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करण्याची वेळ आली.


त्यामुळे शेतकऱ्यांसमोर दुहेरी संकट उभे राहिले आहे. जनावरांचे नुकसान आणि उभ्या पिकांचे झालेले नुकसान यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

### नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन

स्थानिक नागरिकांनी प्रशासनाने तातडीने नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून पंचनामे सुरू करावेत, बाधित शेतकरी आणि नागरिकांना त्वरित आर्थिक मदत, जनावरांच्या नुकसानीची भरपाई तसेच आवश्यक जीवनावश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी केली आहे. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नदी-नाल्यांच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले असून, हवामान विभागाने पुढील काही दिवसही जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केल्याने नागरिकांनी आवश्यक खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

सततच्या पावसामुळे खरीप हंगामातील उभी पिके पाण्याखाली गेली असून कापूस, सोयाबीन, मका आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. शेतामध्ये पाणी साचल्याने पिकांचे भवितव्य धोक्यात आले असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान, अनेक रस्ते, लहान पूल आणि शेतरस्त्यांचे नुकसान झाल्याने काही गावांचा संपर्क काही काळासाठी विस्कळीत झाला. नागरिकांना दैनंदिन कामांसाठी तसेच विद्यार्थ्यांना शाळा आणि शेतकऱ्यांना शेतात जाण्यास अडचणींचा सामना करावा लागत आहे.

# पहाण गावात पावसाच्या पुरामुळे ग्रामस्थ वेढले!



जन सम्राट टाईम्स

**पाचोरा।** प्रतिनिधी: पहाण गावामध्ये गावामध्ये घुसण्यासाठीच बऱ्याच दिवसापासून नागरिकांमध्ये पूल करण्यात यावा या मागणीसाठी अनेक वेळा पाठपुरा करून देखील शासनाने दुर्लक्ष केल्या असल्यामुळे आज शेतकरी कामगार मजूर गेल्या दोन दिवसापासून घराबाहेर देखील निघाले नाहीत कारण संपूर्ण गावाला पावसाच्या पुराने वेढलेले आहे.

त्यामुळे गावकरी शेतामध्ये जाऊ शकत नाही अशी परिस्थिती झालेली आहे कारण जवळपास रोड आणि नदीचे अंतर २० ते ३० फूट खाली असल्यामुळे आणि पहाण मोहाडी शिवारामध्ये वरती धरण असल्यामुळे पाणी पाण्याचा निपसारा होत नसल्यामुळे संपूर्ण गावाला पाणी पुराने वेढलेले आहे तरी शेतकरी कामगार मजूर गेल्या दोन दिवसापासून घराबाहेर देखील निघाले नाहीत कारण संपूर्ण गावाला पावसाच्या पुराने वेढलेले आहे. त्यामुळे गावकरी शेतामध्ये जाऊ शकत नाही अशी परिस्थिती झालेली आहेयाकडे शासनाने लक्ष देऊन तात्काळ उपयोजना करावी अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# भुसावळ तालुका शासकीय क्रीडा स्पर्धा उत्साहात!

## ५२ क्रीडा शिक्षकांची उपस्थिती



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ| प्रतिनिधी :** भुसावळ तालुका शासकीय क्रीडा स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी क्रीडा शिक्षकांची सहविचार सभा गुरुवारी (दि. ३०) पु. ओ. नाहाटा महाविद्यालयाच्या लायब्ररी हॉलमध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी जगदीश चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. सभेला तालुक्यातील ५२ क्रीडा शिक्षक-शिक्षिका उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने झाली. त्यानंतर मान्यवरांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी गटशिक्षणाधिकारी किशोर वायकोळे, तालुका क्रीडा अधिकारी नितीन जंगम, क्रीडा अधिकारी सचिन निकम, डॉ. सुरेश थुरकुडे, विशाल बोडके, प्रा. डॉ. संजय चौधरी, वाय. एम. पाटील, आर. आर. धनगर, महाराष्ट्र राज्य क्रीडा व शारीरिक शिक्षण शिक्षक महासंघाचे राज्य उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष व तालुका क्रीडा समन्वयक डॉ. प्रदीप साखरे, जिल्हा क्रीडा संकुलाचे माने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सभेचे प्रास्ताविक डॉ. प्रदीप साखरे यांनी केले. त्यांनी तालुका क्रीडा स्पर्धांचे नियोजन, आयोजन आणि यशस्वी अंमलबजावणीबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी विलास पाटील यांचा टाटा मुंबई मॅरेथॉन (४२ कि.मी.) सलग तीन वेळा पूर्ण केल्याबद्दल विशेष सत्कार करण्यात आला. तसेच अनिल महाजन, डी. आर. धांडे, आर. एस. कुरेशी यांना आदर्श क्रीडा शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल, तर रितेश तायडे यांना राष्ट्रीय कबड्डी पंच परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल गौरविण्यात आले. मागील वर्षी शासकीय क्रीडा स्पर्धांचे यशस्वी आयोजन करणाऱ्या ताप्ती पब्लिक स्कूल, सेंट अलॉयसिस स्कूल व बियाणी मिलिटरी स्कूल येथील क्रीडा शिक्षकांचाही सन्मान करण्यात आला. मार्गदर्शन करताना गटशिक्षणाधिकारी किशोर वायकोळे यांनी मुख्याध्यापकांनी शासकीय क्रीडा स्पर्धांना पूर्ण सहकार्य करण्याचे आवाहन केले. डॉ. सुरेश थुरकुडे यांनी ऑनलाईन नोंदणी प्रक्रियेची माहिती दिली. अध्यक्षीय समारोपात जिल्हा क्रीडा अधिकारी जगदीश चौधरी यांनी जास्तीत जास्त खेळाडूंचा सहभाग वाढवून स्पर्धा यशस्वी करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याचे आवाहन केले. सभेत विविध क्रीडा स्पर्धांचे स्थळ व वेळापत्रक निश्चित करण्यात आले.

# धुळ्यात रात्रीपासून मुसळधार पाऊस

## जिल्हा रुग्णालयासह शासकीय कार्यालयांमध्ये पाणी

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी:** हवामान विभागाने दिलेल्या अतिवृष्टीच्या इशाऱ्यानुसार धुळे शहर आणि जिल्ह्यात गुरुवारी रात्रीपासून मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. सलग सुमारे १४ तास सुरू असलेल्या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, जिल्हा रुग्णालय, जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालय, शहर पोलीस ठाण्यासह अनेक शासकीय कार्यालयांमध्ये पाणी शिरल्याचे चित्र पाहायला मिळाले.

मुसळधार पावसामुळे जिल्हा रुग्णालय परिसरात गुडघाभर पाणी साचल्याने रुग्ण, नातेवाईक आणि कर्मचारी यांना पाण्यातून वाट काढत रुग्णालयात ये-जा करावी लागली. तसेच विविध शासकीय कार्यालयांच्या आवारातही पाणी साचल्याने कामकाजावर परिणाम झाला. रस्त्यांना तलावाचे स्वरूप धुळे शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने रस्त्यांना तलावाचे स्वरूप आले. काही ठिकाणी वाहनचालकांना रस्त्याचा अंदाज न आल्याने वाहने गटारात अडकल्याच्या घटनाही घडल्या. त्यामुळे वाहतुकीचा वेग मंदावला असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे.

पांजरा नदीच्या पाणीपातळीत वाढ सततच्या पावसामुळे पांजरा नदीच्या पाणीपातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. नदीकाठच्या भागांवर प्रशासनाने विशेष लक्ष ठेवले असून संभाव्य पूरस्थिती लक्षात घेता संबंधित यंत्रणा सतर्क करण्यात आल्या आहेत. शाळा-महाविद्यालयांना सुट्टी अतिवृष्टीचा इशारा आणि नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने जिल्ह्यातील शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे.

तसेच नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, पाण्याने भरलेल्या रस्त्यांवरून प्रवास टाळावा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाने ३० आणि ३१ जुलै रोजी धुळे जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा दिला असून, पुढील काही तासही मुसळधार पावसाची शक्यता कायम असल्याने प्रशासनाने आपत्कालीन यंत्रणा सज्ज ठेवली आहे.


### रस्त्यांना तलावाचे स्वरूप

मुसळधार पावसामुळे जिल्हा रुग्णालय परिसरात गुडघाभर पाणी साचल्याने रुग्ण, नातेवाईक आणि कर्मचारी यांना पाण्यातून वाट काढत रुग्णालयात ये-जा करावी लागली. तसेच विविध शासकीय कार्यालयांच्या आवारातही पाणी साचल्याने कामकाजावर परिणाम झाला. धुळे शहरातील अनेक प्रमुख रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने रस्त्यांना तलावाचे स्वरूप आले.

# जिल्ह्यात मुसळधारची पार्श्वभूमी; नागरिकांनी सतर्क राहावे : पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील

## प्रशासनाला २४ तास सज्ज राहण्याचे निर्देश


जन सम्राट टाईम्स



**जळगाव| प्रतिनिधी:** जळगाव शहरासह जिल्ह्यात गेल्या काही तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी नदी-नाले, ओढे तसेच लहान पुलांवरील पाण्याची पातळी वाढली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी जिल्ह्यातील नागरिक, शेतकरी व ग्रामस्थांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. तसेच सर्व संबंधित शासकीय यंत्रणांना २४ तास सज्ज राहून आपत्कालीन परिस्थितीला तत्काळ प्रतिसाद देण्याचे निर्देश दिले आहेत. पालकमंत्री म्हणाले की, नागरिकांच्या जीवित व मालमत्तेचे संरक्षण ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. त्यामुळे कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाकडून जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत सूचना व इशाऱ्यांचे पालन करावे. अतिवृष्टीच्या काळात अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडणे टाळावे. पाण्याखाली गेलेले रस्ते, पूल, नदी-नाले किंवा ओढे ओलांडण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन त्यांनी केले. शेतकरी बांधवांनी शेतात काम करताना विशेष दक्षता घ्यावी. तुटलेल्या वीजवाहिन्या, वीजेचे खांब, पाण्याने वेढलेली ठिकाणे आणि धोकादायक परिसरापासून सुरक्षित अंतर राखावे. तसेच जनावरांना सुरक्षित ठिकाणी हलविण्याची खबरदारी घ्यावी, असेही त्यांनी सांगितले. पालकमंत्री यांनी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या माध्यमातून पोलीस प्रशासन, महसूल विभाग, महानगरपालिका, नगरपालिका, सार्वजनिक बांधकाम विभाग, महावितरण, आरोग्य विभाग, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तसेच सर्व संबंधित विभागांना सतर्क राहून नागरिकांना आवश्यक ती मदत तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी तात्काळ स्थानिक प्रशासन, तहसील कार्यालय, ग्रामपंचायत, पोलीस किंवा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेशी संपर्क साधावा, असे आवाहनही त्यांनी केले. "संयम, सतर्कता आणि परस्पर सहकार्याच्या बळावर कोणत्याही संकटावर मात करता येते. शासन आणि प्रशासन नागरिकांच्या सेवेसाठी पूर्ण क्षमतेने सज्ज असून प्रत्येकाने स्वतःसह आपल्या कुटुंबाची आणि परिसरातील नागरिकांची सुरक्षितता जपण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी," असे आवाहन पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी केले.कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाकडून जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत सूचना व इशाऱ्यांचे पालन करावे. अतिवृष्टीच्या काळात अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडणे टाळावे. पाण्याखाली गेलेले रस्ते, पूल, नदी-नाले किंवा ओढे ओलांडण्याचा प्रयत्न करू नये, असे आवाहन त्यांनी केले.

# मुसळधार पावसाने जिल्हा परिषद शाळेचे आवार जलमय; विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर

जन सम्राट टाईम्स



**रोटवद । प्रतिनिधी:** धरणगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रोटवद येथे झालेल्या मुसळधार पावसामुळे शाळेच्या संपूर्ण परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेत येणाऱ्या लहान विद्यार्थ्यांना पाण्यातून मार्ग काढत शाळेत प्रवेश करावा लागत असल्याने पालकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. शाळेच्या आवारात साचलेल्या पाण्यामुळे विद्यार्थ्यांची ये-जा अत्यंत धोकादायक बनली आहे. विशेषतः प्राथमिक वर्गातील विद्यार्थ्यांना या परिस्थितीचा मोठा त्रास सहन करावा लागत असून त्यांच्या दैनंदिन शैक्षणिक प्रक्रियेवरही त्याचा परिणाम होत आहे. साचलेल्या पाण्यामुळे परिसरात अस्वच्छता वाढण्याची शक्यता असून डासांची उत्पत्ती, दूषित पाण्यामुळे संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

# शेतकरी कर्जमाफीची दुसरी यादी १० ऑगस्टला जाहीर होणार

## प्रोत्साहन लाभार्थ्यांची यादी सप्टेंबरमध्ये



जन सम्राट टाईम्स

**यावल | प्रतिनिधी :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. योजनेची दुसरी यादी येत्या १० ऑगस्टला जाहीर केली जाणार असल्याची माहिती सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांनी दिली आहे. बातमीचे प्रमुख मुद्दे: पहिली आणि दुसरी यादी: या योजनेअंतर्गत १७ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी तयार झाली असून, दुसरी यादी १० ऑगस्टला प्रसिद्ध होईल. एकूण लाभार्थी: राज्यातील ५६ लाख पात्र शेतकऱ्यांपैकी ३२ लाख शेतकऱ्यांना कर्जमाफी, तर २४ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ दिला जाणार आहे. प्रोत्साहन लाभ स्वतंत्र यादी: प्रोत्साहनपर लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांची स्वतंत्र यादी सप्टेंबर महिन्यात जाहीर करण्यात येईल. पात्रतेची पडताळणी: २० लाख २१ हजार शेतकऱ्यांनी जिल्हा मध्यवर्ती बँकांकडून, तर सुमारे ६ लाख शेतकऱ्यांनी व्यावसायिक बँकांकडून पीक कर्ज घेतले आहे. पात्रतेची खात्री करण्यासाठी डेटा प्राप्त करून तो प्राप्तिकर (Income Tax) विभागाकडे पडताळणीसाठी पाठवण्यात आला आहे. वन टाईम सेटलमेंट (OTS) योजना: २ लाखांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांसाठी १० ऑगस्टपासून 'वन टाईम सेटलमेंट' योजना सुरू करण्यात येणार आहे. यामुळे मोठ्या कर्जाच्या बोझ्याखाली असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. बँक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण: योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यातील सुमारे १७ हजार शाखा अधिकारी व व्यवस्थापकांसाठी विशेष सेमिनार आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जात आहेत. महत्त्वाची नोंद: राज्य सरकारने कर्जमाफी, वन टाईम सेटलमेंट (OTS) आणि प्रोत्साहन लाभ या तिन्ही प्रक्रिया टप्प्याटप्प्याने पूर्ण करण्याचे नियोजन केले आहे.

# मुसळधार पावसामुळे भवरखेडे नदीवरील जुना पूल खचला

## ग्रामपंचायतीच्या युद्धपातळीवरील कामामुळे वाहतूक पुन्हा सुरू

जन सम्राट टाईम्स



**भवरखेडे | प्रतिनिधी :** धरणगाव तालुक्यातील भवरखेडे गावाजवळील नदीवरील जुन्या पुलाचा काही भाग मुसळधार पावसामुळे खचल्याने भवरखेडे–पळासखेडे हा महत्त्वाचा संपर्क मार्ग काही काळासाठी पूर्णपणे बंद झाला होता. नदीला आलेल्या पुरामुळे पुलाची दुरवस्था झाल्याने नागरिकांसह शाळकरी विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, ग्रामपंचायतीने तातडीने युद्धपातळीवर उपाययोजना करून अवघ्या काही तासांत पुलाची तात्पुरती डागडुजी करत वाहतूक पूर्ववत केली. सतत सुरू असलेल्या पावसामुळे नदीतील पाण्याचा प्रवाह वाढला आणि जुन्या पुलाचा काही भाग खचला. त्यामुळे दोन्ही गावांमधील संपर्क तुटल्याने नागरिकांच्या दैनंदिन कामकाजावर परिणाम होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. विद्यार्थ्यांच्या शाळेत जाण्या-येण्यासह अत्यावश्यक सेवांवरही त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात येत होती. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत भवरखेडे ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच आणि सदस्यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. जेसीबी आणि ट्रॅक्टरच्या सहाय्याने खचलेल्या भागात माती व खडी टाकून पुलाची तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली. ग्रामपंचायत पदाधिकारी आणि स्थानिकांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या कामानंतर मार्ग पुन्हा वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. दरम्यान, या घटनेची माहिती सार्वजनिक बांधकाम विभाग (PWD) तसेच जिल्हा परिषद, जळगाव यांच्या संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे. अधिकाऱ्यांकडून लवकरच घटनास्थळी पाहणी करण्यात येणार असून, या ठिकाणी नवीन पुलाच्या उभारणीसाठी आवश्यक कार्यवाही तातडीने सुरू करण्यात येईल, अशी माहिती ग्रामपंचायतीच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.

### पूल उभारण्याची मागणी


**ग्रामपंचायतीने वेळेवर केलेल्या उपाययोजनांमुळे मोठी गैरसोय टळल्याने परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले. मात्र, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी या ठिकाणी कायमस्वरूपी मजबूत पूल उभारण्याची मागणी ग्रामस्थांनी प्रशासनाकडे केली आहे.**

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# मुसळधारच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकाऱ्यांची हतनूर धरणाला भेट; परिस्थितीवर लक्ष ठेवण्याचे निर्देश!

## पूरस्थितीचा घेतला आढावा; नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याच्या सूचना

जन सम्राट टाईम्स



**जळगाव |** जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी शुक्रवारी हतनूर धरणाला भेट देऊन धरणातील जलसाठा, पाण्याची आवक, विसर्ग व्यवस्था तसेच संभाव्य पूरस्थितीचा सखोल आढावा घेतला. यावेळी त्यांनी संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याचे निर्देश देत नागरिकांच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आदेश दिले.

धरण भेटीदरम्यान जलसंपदा विभागाचे उपअभियंता शशिकांत चौधरी यांनी धरणातील सध्याचा जलसाठा, तापी नदीपात्रातील पाण्याचा प्रवाह, पाण्याच्या विसर्गाचे नियोजन तसेच धरणाच्या कार्यस्थितीची सविस्तर माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी धरणावरील नियंत्रण कक्ष, यांत्रिक प्रणाली, गेट्सची कार्यप्रणाली आणि विविध तांत्रिक बाबींची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच नदीपात्रातील पाणीपातळी आणि परिसरातील स्थितीचाही आढावा घेतला. पावसाचा जोर कायम असल्याने परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवणे अत्यावश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. धरणातून पाण्याचा विसर्ग वाढविण्याची वेळ आल्यास त्याची माहिती तातडीने जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तसेच नदीकाठच्या गावांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेशी प्रभावी समन्वय राखून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ प्रतिसाद देण्याची तयारी ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

संभाव्य पूरस्थिती लक्षात घेता प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविणे, सतर्कता वाढविणे आणि संवेदनशील भागांवर विशेष लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने कार्य करत परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवावे, अशी सूचना केली. तसेच नागरिकांनी प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचना, इशारे आणि मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करावे, नदी-नाल्यांजवळ जाणे टाळावे आणि अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहन करण्यात आले.

### तत्काळ प्रतिसाद देण्याची तयारी ठेवावी

जिल्हाधिकाऱ्यांनी धरणावरील नियंत्रण कक्ष, यांत्रिक प्रणाली, गेट्सची कार्यप्रणाली आणि विविध तांत्रिक बाबींची प्रत्यक्ष पाहणी केली. तसेच नदीपात्रातील पाणीपातळी आणि परिसरातील स्थितीचाही आढावा घेतला. पावसाचा जोर कायम असल्याने परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवणे अत्यावश्यक असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. धरणातून पाण्याचा विसर्ग वाढविण्याची वेळ आल्यास त्याची माहिती तातडीने जिल्हा प्रशासन, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तसेच नदीकाठच्या गावांपर्यंत पोहोचविण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यावेळी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेशी प्रभावी समन्वय राखून कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ प्रतिसाद देण्याची तयारी ठेवावी, असेही त्यांनी सांगितले.

# नशिराबादमध्ये तुटलेली वीजतार महावितरणच्या तत्परतेने दुरुस्त!

## बाजार परिसरातील जिवंत वीजतार रस्त्यावर

जन सम्राट टाईम्स





**नशिराबाद|प्रतिनिधी:** नशिराबाद मुसळधार पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे आठवडे बाजार परिसरात मुख्य वीजवाहिनीची जिवंत तार तुटून रस्त्यावर पडल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी तत्परतेने घटनास्थळी धाव घेत सुरक्षिततेच्या उपाययोजना राबवत तुटलेली वीजतार दुरुस्त केल्याने मोठा अनर्थ टळला. मिळालेल्या माहितीनुसार, मुसळधार पावसामुळे मुख्य वीजवाहिनीची तार तुटून रस्त्यावर तसेच साचलेल्या पाण्यात पडली होती. त्यामुळे परिसरातील नागरिक, व्यापारी आणि वाहनचालकांमध्ये घबराट निर्माण झाली. कोणतीही दुर्घटना घडू नये म्हणून तातडीने महावितरणला याची माहिती देण्यात आली. माहिती मिळताच महावितरणचे अधिकारी श्री. पवन वाघूळे आणि त्यांचे पथक अवघ्या काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सर्वप्रथम वीजप्रवाह बंद करण्यात आला. त्यानंतर आवश्यक सुरक्षेची काळजी घेत तुटलेली वीजतार युद्धपातळीवर दुरुस्त करण्यात आली. सतत सुरू असलेल्या पावसातही कर्मचाऱ्यांनी धाडसाने काम करत अल्पावधीतच वीजपुरवठा पूर्ववत केला. त्यामुळे संभाव्य जीवितहानी टळली असून परिसरातील जनजीवनही लवकर सुरळीत झाले. महावितरणच्या या तत्पर सेवेमुळे आठवडे बाजार परिसरातील नागरिक, व्यापारी आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत संपूर्ण पथकाचे विशेष कौतुक केले. संकटाच्या काळात वेळेवर मदतीसाठी धावून आल्याबद्दल नागरिकांनी महावितरण कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स | ब्रेक न्यूज | ज

# भडगाव तालुक्यातील नालबंदी येथे अचानक पूर

## शिक्षक इम्तियाज खान यांची थरारक सुटका, ग्रामस्थांच्या धाडसाचे सर्वत्र कौतुक

जन सम्राट टाईम्स



**भडगाव | प्रतिनिधी :** भडगाव तालुक्यातील नालबंदी येथे आज सकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे अचानक पूरस्थिती निर्माण झाली. गावाजवळील के.टी. वेअर (K.T. Weir) आणि परिसरातील नाल्यांना आलेल्या प्रचंड पाण्यामुळे पुराचे पाणी वेगाने वाढून शाळेच्या परिसरात शिरले. या अचानक उद्भवलेल्या परिस्थितीत शाळेत उपस्थित असलेले शिक्षक इम्तियाज खान यांच्या जीवाला धोका निर्माण झाला. मात्र ग्रामस्थांच्या प्रसंगावधान, धाडस आणि तत्परतेमुळे त्यांची सुखरूप सुटका करण्यात आली.

नेहमीप्रमाणे सकाळी शाळेत पोहोचलेले शिक्षक इम्तियाज खान अध्यापनाच्या तयारीत असतानाच काही मिनिटांत पुराचे पाणी शाळेत घुसले. पाण्याचा वेग इतका प्रचंड होता की, शाळेबाहेर पडण्याचा मार्ग पूर्णपणे बंद झाला. परिस्थिती गंभीर होत असल्याचे लक्षात येताच त्यांनी स्वतःचा जीव वाचवण्यासाठी शाळेच्या गच्चीवर आश्रय घेतला.

घटनेची माहिती गावात पसरताच ग्रामस्थांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेतली. जीवाची पर्वा न करता स्थानिक नागरिकांनी एकजुटीचे दर्शन घडवत सुरक्षित पद्धतीने शिक्षक इम्तियाज खान यांना गच्चीवरून खाली आणून सुखरूप बाहेर काढले. या धाडसी बचाव मोहिमेमुळे मोठा अनर्थ टळला आणि सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

या बचावकार्यात मा. सरपंच शेख रफियोद्दीन शेख मुनीर, भगवान निकुम, समीर शेख, माजहर शेख, प्रकाश ठाकरे तसेच पोलिस पाटील सुदाम मोरसिंग यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या धाडसाचे आणि तत्परतेचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

अचानक आलेल्या पुरामुळे नालबंदी गावात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र पुराच्या पाण्यामुळे गावातील जनजीवन विस्कळीत झाले असून नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान, स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे गावाजवळील के.टी. वेअर आणि नाल्यांच्या परिसरात कायमस्वरूपी सुरक्षा उपाययोजना कराव्यात, पूरस्थितीचा इशारा देणारी यंत्रणा उभारावी आणि पावसाळ्यात विशेष सतर्कता ठेवावी, अशी मागणी केली आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा दिल्याने नागरिकांनी नदी, नाले आणि पूरग्रस्त भागाजवळ जाणे टाळावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# आरोनमध्ये जैन मुनींसोबत कथित गैरवर्तन; दोन महिलांविरुद्ध गुन्हा, पोलिस ठाण्यावर मोर्चा

## धार्मिक भावना दुखावल्याचा दावा, कारवाईची समाजाची मागणी

जन सम्राट टाईम्स



**गुना(मध्य प्रदेश)| प्रतिनिधी:** मध्य प्रदेशातील गुना जिल्ह्यातील आरोन कसब्यात चातुर्मासादरम्यान जैन मुनींसोबत कथित गैरवर्तन झाल्याच्या आरोपानंतर जैन समाजात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणी दोन महिलांविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून घटनेच्या निषेधार्थ मोठ्या संख्येने समाजबांधवांनी आरोन पोलिस ठाण्यासमोर आंदोलन करत कठोर कारवाईची मागणी केली. मिळालेल्या माहितीनुसार, जैनाचार्य विद्यासागरजी महाराज यांचे शिष्य मुनिश्री निर्मोह सागरजी महाराज हे सध्या आरोन येथे सुरू असलेल्या चातुर्मासासाठी मुक्कामी आहेत. गुरुवारी सकाळी आहारचर्या पूर्ण करून ते मंदिराकडे परतत असताना ही घटना घडल्याचा आरोप करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, प्रताप जैन यांच्या घरासमोर कीर्ति सोलंकी आणि पूजा सोलंकी यांनी मुनिश्रींसोबत कथित अयोग्य वर्तन करत शिवीगाळ केली. तसेच जैन समाजाविषयीही आक्षेपार्ह शब्दांचा वापर केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याशिवाय, भविष्यात या मार्गावरून जैन साधू-महात्मे गेल्यास त्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

या घटनेची माहिती परिसरात पसरताच जैन समाजात तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली. यानंतर सकल दिगंबर जैन समाजाचे अध्यक्ष विजय कुमार जैन यांच्या नेतृत्वाखाली समाजबांधवांनी आरोन पोलिस ठाण्यावर मोर्चा काढत निवेदन सादर केले. संजय जैन, संतोष जैन, संजीव जैन, मिंटूलाल जैन, अमन जैन, जॅकी जैन, राजीव जैन, मुनेश जैन यांच्यासह मोठ्या संख्येने समाजातील नागरिक यावेळी उपस्थित होते. निवेदनात जैन मुनींसोबत झालेला कथित दुर्व्यवहार हा संपूर्ण जैन समाजाच्या धार्मिक भावना दुखावणारा प्रकार असल्याचे नमूद करण्यात आले असून, दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. पोलिसांनी तक्रारीची दखल घेत संबंधित दोन महिलांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (BNS) लागू कलमांनुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू असल्याची माहिती देण्यात आली आहे. या प्रकरणाचा तपास सुरू असून, संबंधित आरोपांबाबत न्यायालयीन प्रक्रिया व पोलिस तपासानंतरच अंतिम तथ्य स्पष्ट होणार आहेत. तक्रारीनुसार, प्रताप जैन यांच्या घरासमोर कीर्ति सोलंकी आणि पूजा सोलंकी यांनी मुनिश्रींसोबत कथित अयोग्य वर्तन करत शिवीगाळ केली. तसेच जैन समाजाविषयीही आक्षेपार्ह शब्दांचा वापर केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. याशिवाय, भविष्यात या मार्गावरून जैन साधू-महात्मे गेल्यास त्यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही गंभीर आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

# पूरग्रस्तांच्या वेदना शब्दांत मावणाऱ्या नाहीत

## जिल्हाधिकारी रोहन घुगे यांची पुरग्रस्त भागात पाहणी

जन सम्राट टाईम्स

पारोळा। (प्रतिनिधी): काल रात्रीपासून पारोळा तालुक्यात आणि जिल्हयात सुरू झालेल्या अति मुसळधार पावसाने संपूर्ण जळगाव जिल्ह्याला अक्षरशः झोडपून काढले आहे. नद्या-नाले दुथडी भरून वाहत असून अनेक गावांमध्ये पाणी शिरल्याने जनजीवन पूर्णतः विस्कळीत झाले आहे. शेतकऱ्यांच्या हिरव्यागार शिवारांवर आज पाण्याचे साम्राज्य पसरले आहे. काबाड कष्टाने उभी केलेली पिके, संसारोपयोगी साहित्य, पशुधन आणि अनेकांचे आयुष्यभराचे कष्ट क्षणात वाहून गेल्याचे अत्यंत वेदनादायी चित्र पारोळा तालुक्यात सर्वत्र पाहायला मिळत आहे. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्या समवेत पारोळा तालुक्यातील मुंदाणे प्र.उ., देवगाव, टोळी, तरडी आणि उंदीरखेडे या पूरग्रस्त गावांना भेट देऊन प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केली. प्रत्येक गावात पाण्याने केलेला विध्वंस पाहून मन सुन्न झाले. अनेक कुटुंबांच्या डोळ्यांत असहाय्यतेचे अश्रू होते, तर शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर वर्षभराच्या मेहनतीवर पाणी फिरल्याची वेदना स्पष्ट दिसत होती. अशी वेळ कोणावरही येऊ नये, अशीच भावना प्रत्येक क्षणी मनात दाटून आली. या संपूर्ण परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत संबंधित प्रशासनाला तातडीने मदतकार्य अधिक गतिमान करण्याच्या, नागरिकांना सुरक्षितस्थळी हलविण्याच्या आणि अन्न, पिण्याचे पाणी, औषधे, पशुधनासाठी आवश्यक व्यवस्था आणि पंचनाम्यांची प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याच्या स्पष्ट सूचना आमदार अमोल पाटील यांच्याकडून देण्यात आल्या, पूरग्रस्तांना शासनाच्या सर्व मदतीचा लाभ वेळेत मिळावा यासाठी सातत्याने पाठपुरावा केला जाणार आहे असे हि त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले. सध्याच्या हवामान विभागाच्या अंदाजानुसार पुढील काही दिवसही मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता कायम आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे, नदी-नाले, पूल आणि पाण्याचा प्रवाह असलेल्या ठिकाणी जाणे टाळावे तसेच स्वतःची व आपल्या कुटुंबाची सुरक्षितता सर्वप्रथम जपावी, असे नम्र आवाहन शासनामार्फत केले जात आहे. या कठीण प्रसंगी आमदार अमोल पाटील हे स्वतः संपूर्ण प्रशासनाच्या संपर्कात असून पूरग्रस्त बांधवांच्या प्रत्येक अडचणीत आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. या संकटाच्या काळात आपण सर्वांनी एकमेकांना आधार देत, संयम आणि धैर्याने या नैसर्गिक आपत्तीवर निश्चितच मात करू. या पूरग्रस्त कुटुंबांच्या भेटी प्रसंगी जिल्हाधिकारी रोहन घुगे, जि.प. कृषी सभापती डॉ. दिनकर पाटील, तहसीलदार डॉ. उल्हास देवरे, गटविकास अधिकारी डॉ. भुषण कदम, पोलीस निरीक्षक दिपक पवार, तालुकाप्रमुख मधुकर पाटील, समीर पाटील, आधार पाटील, डॉ. राजेंद्र पाटील, एकनाथ पाटील संबंधित ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अंजनी धरणाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी; सतर्कतेचे निर्देश

जन सम्राट टाईम्स



**एरंडोल । प्रतिनिधी:** जळगाव जिल्हाधिकारी यांनी शुक्रवारी (दि. ३१ जुलै) एरंडोल तालुक्यातील अंजनी धरणाला भेट देऊन धरणातील पाणीपातळी, उपलब्ध जलसाठा तसेच धरणाच्या सुरक्षिततेसंदर्भातील विविध तांत्रिक बाबींची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांकडून धरणाची सद्यस्थिती, पाण्याची आवक, जलसाठ्याची स्थिती तसेच आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची सविस्तर माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली. मान्सूनच्या पार्श्वभूमीवर कोणतीही संभाव्य परिस्थिती उद्भवल्यास त्याचा प्रभावीपणे सामना करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी पूर्ण सज्ज राहावे, परस्पर समन्वय राखून काम करावे आणि आवश्यक त्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिले. तसेच धरण परिसरातील सुरक्षाव्यवस्था, पाणीपातळीवरील सातत्याने देखरेख, आवश्यक यंत्रसामग्रीची उपलब्धता आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने सर्व यंत्रणा सतर्क ठेवण्याच्या सूचनाही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केल्या. मान्सून काळात नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

# धानोरा–मोहाडी रेल्वे पुलाखाली पुराचे पाणी; वाहतूक ठप्प!

## नागरिकांना सतर्कतेचे आवाहन



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव तालुक्यातील धानोरा ते मोहाडी दरम्यान असलेल्या रेल्वे पुलाखाली मुसळधार पावसामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी साचून पुराचा प्रवाह सुरू झाला आहे. पुलाखालून पाण्याचा वेग वाढल्याने या मार्गावरील वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली असून नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. सतत सुरू असलेल्या पावसामुळे परिसरातील नदी-नाल्यांना पूर आला असून त्याचा परिणाम रेल्वे पुलाखालील रस्त्यावर झाला आहे. पाण्याचा लोट वाढल्याने दुचाकी, चारचाकी तसेच पादचाऱ्यांसाठी हा मार्ग धोकादायक बनला आहे. त्यामुळे सुरक्षेच्या कारणास्तव नागरिकांनी या मार्गाचा वापर टाळावा, असे आवाहन करण्यात येत आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पावसाच्या प्रत्येक मोठ्या सरीत या ठिकाणी पाणी साचत असल्याने वाहतुकीचा प्रश्न निर्माण होतो. यामुळे कामानिमित्त, शिक्षणासाठी आणि दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

प्रशासनाने परिस्थितीवर लक्ष ठेवून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात, तसेच पाणी ओसरत नाही तोपर्यंत या मार्गावर सतर्कता बाळगावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. नागरिकांनी कोणताही धोका पत्करून पुलाखालून जाण्याचा प्रयत्न करू नये आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पावसाच्या प्रत्येक मोठ्या सरीत या ठिकाणी पाणी साचत असल्याने वाहतुकीचा प्रश्न निर्माण होतो. यामुळे कामानिमित्त, शिक्षणासाठी आणि दैनंदिन प्रवास करणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे.

# श्री व्यायाम प्रसारक मंडळाच्या अध्यक्षपदी विसावे बिनविरोध

## श्रावणातील पारंपरिक कुस्ती दंगल यंदाही भव्य स्वरूपात आयोजित करण्याचा निर्धार

जन सम्राट टाईम्स



**धरणगाव | प्रतिनिधी :** धरणगाव येथील ऐतिहासिक श्री व्यायाम प्रसारक मंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहपूर्ण आणि खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेत मंडळाच्या नवीन कार्यकारिणीची बिनविरोध निवड करण्यात आली असून भानुदास विसावे यांची अध्यक्षपदी पुढील पाच वर्षांसाठी एकमताने पुनर्निवड करण्यात आली. नवीन कार्यकारिणीत मंगलदास भाटिया यांची उपाध्यक्ष, प्रशांत वाणी यांची सचिव, विलास येवले यांची सहसचिव, तर कमलेश तिवारी यांची खजिनदारपदी बिनविरोध निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडीचे उपस्थित सदस्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत करत अभिनंदन केले. सभेत मंडळाच्या गेल्या वर्षभरातील विविध क्रीडा आणि सामाजिक उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. तसेच धरणगावचे ग्रामदैवत श्री मरी माता यात्रेनिमित्त श्रावण महिन्यात आयोजित करण्यात येणाऱ्या पारंपरिक चार मंगळवारांच्या कुस्ती दंगलीचे नियोजन करण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. यंदाही राज्यभरातील नामांकित मल्लांच्या सहभागातून ही कुस्ती दंगल भव्य आणि दिमाखदार स्वरूपात आयोजित करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. या सभेला माजी नगराध्यक्ष सुरेश चौधरी, उद्योगपती जीवन बयस, शिवसेनेचे उपनेते गुलाबराव वाघ यांच्यासह मंडळाचे सदस्य दिनकर पाटील, देवा महाजन, नगरसेवक सुनील चौधरी, शरद भोई, किशोर पैलवान, प्रकाश पाटील, किशोर वाणी, राजेंद्र न्हायदे, बाळकृष्ण येवले, गोपाल पाटील, नारायण महाजन, गुरु पैलवान, किरण सोनवणे, रावा भोई, किरण वाणी, नंदू करोसिया आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. नवीन कार्यकारिणीने मंडळाच्या गौरवशाली परंपरेला साजेसे सामाजिक, क्रीडा आणि युवकाभिमुख उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

### दर्जेदार उपक्रम

कुस्ती परंपरा जतन करून नव्या पिढीतील मल्लांना प्रोत्साहन देण्यासाठी सर्व सदस्यांच्या सहकार्याने सातत्याने कार्य करण्याचा विश्वास नवनिर्वाचित अध्यक्ष भानुदास विसावे यांनी व्यक्त केला. क्रीडा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या श्री व्यायाम प्रसारक मंडळाच्या नव्या कार्यकारिणीकडून आगामी काळात विविध दर्जेदार उपक्रम राबविले जातील.

# सत्यशोधक अण्णाभाऊ साठे!

ये आजादी झुठी है देश की जनता भुकी है " अशी सिंहगर्जना करणारे, भारतातील थोर समाज सुधारक, सत्यशोधक, लोकशाहीर, साहित्यसम्राट अण्णाभाऊ साठे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वारणेच्या खोऱ्यात वाटेगाव येथे १ ऑगस्ट, १९२० झाला. वडिलांचे नाव भाऊराव सिधोजी साठे व आईचे नाव वालूबाई होते. अण्णा भाऊंचे नाव तुकाराम असे ठेवण्यात आले. त्याच वेळी फकीराने इंग्रजांचा खजिना लुटलेला होता. खजिन्याची लूट गावात वाटली जात होती. भाऊराव साठेच्या दारात उभा राहून फकीरानं आवाज दिला. तुकारामच्या जन्माची आनंद वार्ता फकीरास समजली. दोन ओंजळी सुरती रूपये अक्कांच्या ओंजळीत टाकून "बाळ व बाळंतीनीची काळजी घ्या." असं सांगून घोड्याला टाच मारली. भाऊराव व वालूबाई यांना पाच अपत्य होते. त्यातली चार वाचली. तुकाराम, भागूबाई , शंकर, जाई या सर्व भावंडात तुकाराम सर्वांत मोठा म्हणून त्यास अण्णा म्हटले जाऊ लागले. तुकाराम बालपणापासून खोडकर व कुशाग्र बुद्धीमत्तेचा होता व निरीक्षण शक्ती अफाट होती. भाऊराव साठे यांनी मुलास शाळेत दाखल केले. पहिल्याच दिवशी तुकारामास जातियतेचा अनुवभ आला. ब्राह्मणांची मुलं मराठ्यांच्या मुलांनासुद्धा स्पर्श करत नव्हती. १९ व्या शतकातील ग्रँड डफ या इतिहासकाराने असा उल्लेख केला आहे की, महाराष्ट्रातील ब्राह्मणवर्ग मराठा समाजास जनावरांपेक्षा थोडी जास्त किंमत देतो. शाळेत ब्राह्मण मास्तर होते. शाळेत दुसऱ्याच दिवशी अक्षरे काढता येत नाहीत म्हणून मास्तरांनी अण्णाभाऊंचा हात जमिनीवर ठेवला व त्यावर छडीने बेदम मार दिला. शिक्षेचा अमानुष प्रकार घडला. अण्णाभाऊंनी मास्तराचं डोकं फोडलं नी अण्णाभाऊंची शाळा सुटली ती कायमचीच. वाटेगावात ओला दुष्काळ पडला होता. भाऊराव साठेंनी आपल्या लहान मुलांना घेऊन मुंबईची वाट धरली. त्यावेळी अण्णाभाऊंचं वय होतं बारा



वर्षांचं. डोक्यावर गाठोडे घेऊन ही मुलं पायी चालत होती. २२७ मैलाचं अंतर पायी चालून पूर्ण केले. ठाणे जिल्ह्यात कल्याण येथे आल्यावर अण्णाभाऊंनी हमालीचं काम सुरू केलं. या सोबतच डोअर किपर, हॉटेल बॉय, घराची साफसफाई करणे, बूट पॉलिश करणे, कुत्रा सांभाळणे, बागकाम, इलेक्ट्रिक तारा ओढणारा मजूर इत्यादी कामे बालपणी पोटाची खळगी भरण्यासाठी करावी लागली. कापडमीलमध्ये काम करत असतांना जगासाठी वस्त्र विणणाऱ्या कामगारांना स्वतःचेच अंग झाकायला कपडे का मिळत नाहीत ? हा प्रश्न त्यांना पडे. टोलेजंग इमारती बांधणाऱ्यांना झोपडीत का रहावं लागतं ? पृथ्वीवरील सर्व लेकरे देवाचीच असताना ही शिवाशिव कशी ? प्राण्यांना देव मानलं जातं पण माणसांचा स्पर्श का चालत नाही, असे अनेक प्रश्न त्यांना सतावत होते. इ.स.१९३४ च्या दरम्यान रशियन राज्यक्रांतीचा इतिहास कॉम्रेड लेनिनचे चरित्र ही पुस्तके मिळवून अण्णाभाऊंनी वाचून काढली. अण्णाभाऊ हे सत्याचा शोध घेणारे होते त्यामुळे भारतातील थोर समाज सुधारक राष्ट्रपिता महात्मा जोतिराव फुले, आरक्षणाचे जनक लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज आणि भारतीय संविधानाचे शिल्पकार विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर या महान विचारांचा प्रभाव त्यांच्या अंतःकरणावर पडला. अण्णाभाऊ पेटी, तबला, ढोलकी, बुलबुलतरंग, सारंगी अशी सर्वच वाद्य वाजवण्यात तरबेज होते. तलवारबाजी, कुऱ्हाड, दांडपट्टा ही हत्यारे ते कौशल्याने चालवत. क्रांतीसिंह नानासाहेब पाटील यांचं स्फुर्तीदायी भाषण ऐकूण अण्णाभाऊंनी स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली होती. मुंबईतील कामगार वर्गाच्या संपर्कामुळं वयाच्या पंधरा-सोळा वर्षांपासूनच अण्णाभाऊ कामगार चळवळीत सहभागी झाले.

कार्ल मार्क्सचे तत्वज्ञान वाचून ते कम्युनिस्ट पक्षात सामील झाले. इ.स. १९३५ ला अण्णाभाऊंनी साहित्य निर्मितीला सुरूवात केली. अण्णाभाऊंना चित्रपटाचं विशेष आकर्षण होतं. चित्रपट सुरू झाला की, कलाकारांची नावे येत असत ती मराठी, हिंदी आणि गुजराती भाषेत असायची. शेजारील माणसे ती मोठ्याने वाचायची. त्याच पाट्या, नावे पाहून अण्णाभाऊ गुजराती शिकले. इ.स. १९३७ ला त्यांनी स्टॅलिनग्राडचा पोवाडा लिहिला. मजुरांना तो खूप आवडला. १९३८ ला भाऊरावांचे निधन झाल्यावर कुटुंबाची सर्व जबाबदारी अण्णाभाऊंवर आली. इ.स. १९३९ मध्ये अण्णाभाऊ गावाकडे आले. तेथे कोंडाबाई



**मा.पी डी पाटील सर**
महात्मा फुले हायस्कूल धरणगाव.

सोबत त्यांचा विवाह संपन्न झाला. १९४२ च्या चलेजाव आंदोलनातही अण्णाभाऊंनी सहभाग घेतला. इ.स. १९४३ ला त्यांना पुण्याला काम मिळालं. या ठिकाणी जयवंताबाई नावाच्या महिलेशी त्यांनी नोंदणी पद्धतीने विवाह केला. इ.स. १९४४ मध्ये अण्णाभाऊ साठे, शाहीर अमर शेख आणि शाहीर गव्हाणकर यांनी लाल बावटा पथकाची स्थापना केली. बापू साठे यांच्यासोबत ते तमाशात काम करू लागले. अण्णाभाऊ हे प्रतिभावान शाहीर होते. त्यांचा मूळ पिंड शाहिरीचा होता. लोक रंजनातून जनजागृती लोकशिक्षण ही शाहिराचे काम असते हेच कार्य 'शाहीराचे सरताज ' अण्णाभाऊंनी मोठ्या जोमाने केले. अण्णाभाऊंनी जुन्या पारंपारिक चालेल स्वीकारल्या पण आपल्या रचनेत सामाजिक विषमता, जनसामान्यांचे प्रश्न, भ्रष्टाचार, महागाई, देशाभिमान या विषयांना प्राधान्य दिले. त्यामुळे त्यांची शायरी गीते भावली. अण्णाभाऊंचे महाराष्ट्रावर निस्सीम प्रेम होते ते सहज म्हणतात, "महाराष्ट्रावरूनी टाक ओवाळून काया " हा महाराष्ट्र शासनकर्त्या वीरांचा, कष्टकरी श्रमिकांचा, संतांचा आहे. अण्णाभाऊंनी "महाराष्ट्राची परंपरा " नावाचा पोवाडा लिहिला. अण्णाभाऊंचे महाराष्ट्र गीत त्याकाळी अनेक कलापथकातून मिळण्यातून गायले जायचे. " माझी मैना गावावर राहिली " ही लावणी देश प्रेमाची आहे. संयुक्त महाराष्ट्राची आहे. कामगार कष्टकरी मराठी माणसांनी लढ्यात स्वतःला झोकून दिले आणि हुतात्मे पत्करले त्याची कहाणी आहे. बर्लिनचा पोवाडा, बंगालची हाक, पंजाब - दिल्लीचा दंगा, तेलंगणाचा संग्राम, महाराष्ट्राची परंपरा, अमळनेरचे अमर हुतात्मे, मुंबईचा कामगार, काळा बाजाराचा पोवाडा या दहा पोवाड्यांशिवाय अण्णांनी शेकडो गीते पदे रचली. "अमळनेरचे अमर हुतात्मे " आणि "मुंबईचा गिरणी कामगार " हे दोन पोवाडे महाराष्ट्रातील साम्यवादी लढ्याचे आणि परंपरेचे दर्शन घडविणारे पोवाडे आहेत. शाहीर अमर शेख म्हणतात, शाहिरी जीवन हा महाराष्ट्राला लिहिलेला अनमोल नजरांना अण्णाभाऊंनी सार्थकी लावला.

महापुरूषांवर आधारित अनेक पुस्तके त्यांनी वाचून काढली. इ.स. १९४५ मध्ये अण्णाभाऊंची पहिली कादंबरी चित्रा रशियात प्रकाशित झाली. पुढे अण्णाभाऊंनी वारणेच्या खोऱ्यात, मास्तर, वारणेचा वाघ, फकिरा,अग्निदिव्य, चंदन, चिखलातील कमळ, टिळा लाविते मी रक्ताचा, वैजंता, रत्ना, रानगंगा, आघात, गुलाम, मयुरा, मूर्ती, माकडीचा माळ, अलगुज अशा कितीतरी कादंबऱ्या लिहिल्या. असंख्य कथा लिहिल्या. पोवाड्यांची रचना केली. वगनाट्य, नाटके, प्रवासवर्णन, चित्रपट कथा, यासंबंधी देखील अण्णाभाऊ साठेंनी लिखान केले. अगणित कृषीगीते, गवळणी, लावणी, भीमगिते इत्यादींची रचना केली. इ.स. १९५० ते १९५६ च्या कालावधीमध्ये अण्णाभाऊ साहित्यक्षेत्रात अतिउच्च शिखरावर जाऊन बसले होते.

१५ ऑगस्ट, १९४७ ला भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि ' १६ ऑगस्ट ऑगस्टला मुंबईला वीस हजार लोकांचा भर पावसात मोर्चा काढतात आणि अण्णाभाऊ सिंहगर्जना करतात " ये आजादी झुटी है देश की जनता भुकी है. " एक सच्चा समाजसेवक म्हणून अण्णाभाऊंनी परिवर्तनाची फार मोठी चळवळ उभी केली. अण्णाभाऊ साठेंनी लिहिलेल्या "फकिरा " या कादंबरीस महाराष्ट्र सरकारने प्रथम पारितोषिक देवून अण्णाभाऊंचा गौरव केला. इ.स. १९६१ ला अण्णाभाऊंनी रशियाला प्रयाण केले. ताश्कंद, लेनिनग्राड, मॉस्को, स्टॅलिनग्राड इत्यादी शहरांना भेटी दिल्या. रशियाला छत्रपती शिवाजी महाराजांची ओळख करून दिली. अण्णाभाऊ नेहमीच उपेक्षित माणसांच्या बाजूने उभे राहिले. अण्णाभाऊंनी स्वातंत्र्य म्हणजे काय ? स्वातंत्र्य कशासाठी हवे ? याची स्पष्टता करणारे विपुल साहित्य निर्माण केले. मार्क्सवाद आणि आंबेडकरवाद याचा विलक्षण प्रभाव अण्णाभाऊंवर होता. स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, जातीयंताचा लढा ही डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाची चतु : सूत्री होती. १९५६ नंतर अण्णाभाऊ डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक आंदोलनाकडे झुकू लागले होते. डॉ.बाबासाहेबांचा गौरव करताना अण्णाभाऊ म्हणतात, " जग बदल घालूनी घाव हे सांगून गेले मला भीमराव " हे प्रसिद्ध गीत या गोष्टीची साक्ष आहे.

अण्णाभाऊ साठे हे एक समाज सुधारक, लोककवी आणि अपेक्षितांचे लेखक होते. एका अस्पृश्य मातंग समाजात जन्मलेले एक दलित व्यक्ती होते आणि आपल्या साहित्यातून जीवनानुभावासोबत समतेची, विश्वबंधुत्वाची मांडणी करून शोषित, वंचित, दलित, पीडित वर्गाच्या दुःखाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला आहे. मराठी साहित्यात ग्रामीण आणि दलित साहित्याची एकाच वेळी भर टाकणारे अण्णाभाऊ हे एकमेव साहित्यिक होते. मराठी साहित्य विश्वात साहित्यसम्राट म्हणून त्यांचा उल्लेख विशेषत्वाने केला जातो. अशा या सत्याचा शोध घेणारा नाटककार, कादंबरीकार, लोकनाट्याचे जनक, यशस्वी शाहीर, उत्कृष्ट कथाकार, सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांचे १८ जुलै १९६९ रोजी निधन झाले. अशा या महामानवास कोटी कोटी वंदन !...

# जनतेने केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा : आ. किशोर आप्पा पाटील

## पाचोरा येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' उत्साहात

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी :** पाचोरा–भडगाव विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' मोठ्या उत्साहात पार पडले. महाराष्ट्र कृषी विकास महामंडळाच्या गोडाऊन परिसरात झालेल्या या शिबिरात सुमारे पाच ते साडेपाच हजार लाभार्थ्यांना केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यात आला. या शिबिराचे अध्यक्षस्थान आमदार किशोर आप्पा पाटील यांनी भूषविले, तर जिल्हाधिकारी रोहन घुगे प्रमुख उपस्थित होते. यावेळी जिल्हा प्रमुख रावसाहेब पाटील, बाजार समितीचे सभापती गणेश पाटील, उपनगराध्यक्ष किशोर बारवकर, उपसभापती पी. ए. पाटील, प्रांताधिकारी भूषण अहिरे, तहसीलदार विजय बनसोडे, भडगाव तहसीलदार शीतल सोलाट, मुख्याधिकारी मंगेश देवरे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी व कर्मचारी उपस्थित होते. शिबिरात महसूल, पंचायत समिती, कृषी, वन, पशुसंवर्धन, आरोग्य, महिला व बालविकास, शिक्षण, परिवहन, महावितरण, भूमी अभिलेख, आरटीओ, नगरपालिका, बँका, बीएसएनएल आदी विभागांच्या योजनांची माहिती देण्यात आली. लाभार्थ्यांना विविध दाखले, प्रमाणपत्रे, डिजिटल ७/१२, फेरफार नोंदी, उत्पन्न, जाती, रहिवासी, नॉन-क्रीमीलेअर दाखले, रेशनकार्ड सेवा, संजय गांधी योजना, पीएम किसान, प्रधानमंत्री आवास



योजना, आयुष्मान भारत कार्ड, लेक लाडकी योजना, मातृवंदना योजना, स्वामित्व योजना, कृषी अनुदान, पशुपालन योजना, सोलर रूफटॉप, स्मार्ट मीटर, ड्रायव्हिंग परवाना, बँकिंग सेवा आदींचा लाभ देण्यात आला. याशिवाय कृषी विभागामार्फत विविध कृषी अवजारे, यंत्रांचे वाटप, अॅग्रीस्टॅक नोंदणी, महाविस्तार अॅपची माहिती तसेच शेतकऱ्यांसाठी विविध अनुदान योजनांचे मार्गदर्शन करण्यात आले. पशुसंवर्धन विभागामार्फत शेळीपालन, दुधाळ जनावरे, मका बियाणे वितरण व इतर योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी बोलताना आमदार किशोर आप्पा पाटील म्हणाले की, "महसूल समाधान शिबिरामुळे नागरिकांची प्रशासनात प्रलंबित असलेली अनेक कामे एकाच छताखाली मार्गी लागतात. शेतकरी, सर्वसामान्य नागरिक आणि लाभार्थ्यांना योजनांचा लाभ सुलभपणे मिळणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे." त्यांनी जिल्हाधिकारी रोहन घुगे, प्रांताधिकारी भूषण अहिरे, तहसीलदार विजय बनसोडे तसेच सर्व विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक केले. मात्र, पंचायत समिती व महसूल विभागात काही ठिकाणी दलाल सक्रिय असल्याचा गंभीर आरोप करत अशा प्रकारांना आळा घालण्याची मागणीही त्यांनी केली. काही अधिकारी लाभार्थ्यांकडून पैसे घेतल्याशिवाय कामे करत असल्याचेही त्यांनी नमूद करत जिल्हाधिकाऱ्यांनी याची गंभीर दखल घ्यावी, असे सांगितले. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत नागरिकांनी सर्व योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. तसेच प्रशासन नागरिकांच्या सेवेसाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. शिबिराला दोन्ही तालुक्यांतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध विभागांच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले. शासनाच्या योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने हे अभियान अत्यंत प्रभावी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# आ. किशोर आप्पा पाटील यांची पाहणी; नुकसानग्रस्तांची मदतची मागणी!

## वाल्मिकी नगर जलमय, घरांसह दुकानांचे मोठे नुकसान

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी :** पाचोरा शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे जनता वसाहत व वाल्मिकी नगर परिसरात पूरस्थिती निर्माण झाली असून अनेक घरांमध्ये आणि दुकानांमध्ये पावसाचे पाणी शिरल्याने नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. घरगुती साहित्य, किराणा माल, फर्निचर, इलेक्ट्रॉनिक वस्तू तसेच अन्य जीवनावश्यक साहित्याचे नुकसान झाल्याने नागरिकांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. सततच्या पावसामुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर पाणी साचले. नाल्यांची नियमित साफसफाई न झाल्याने तसेच पावसाच्या पाण्याचा योग्य निचरा न झाल्याने ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला. अनेक कुटुंबांना घरातील पाणी बाहेर काढण्यासाठी तासन्तास प्रयत्न करावे लागले, तर



अनेक दुकानदारांना दुकाने बंद ठेवावी लागल्याने आर्थिक फटका बसला. घटनेची माहिती मिळताच आमदार किशोर आप्पा पाटील यांनी तातडीने पूरग्रस्त भागाला भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. यावेळी तहसीलदार विजय बनसोडे, नगरपालिकेचे मुख्याधिकारी मंगेश देवरे, नगराध्यक्ष सुनिता पाटील, उपनगराध्यक्ष किशोर बारवकर, नगरसेविका वर्षा ब्राह्मणे तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. पाहणीदरम्यान स्थानिक नागरिकांनी प्रशासनासमोर आपल्या अडचणी मांडत घरांमध्ये व दुकानांमध्ये झालेल्या नुकसानीची माहिती दिली. नुकसानग्रस्तांना तातडीने आर्थिक मदत मिळावी, तसेच पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली. यावेळी प्रशासनाने परिस्थितीचा आढावा घेत नुकसानग्रस्त भागांचे पंचनामे करून शासनाकडून नियमानुसार मदत मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

# लांडोर बंगला येथे महामानवाला लाखो भीमसैनिकांचे अभिवादन

## 'जय भीम' च्या घोषणांनी परिसर दुमदुमला



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या धुळे तालुक्यातील लळींग येथील ऐतिहासिक लांडोर बंगला परिसरात ३१ जुलै रोजी आयोजित भीम स्मृती यात्रा मोठ्या उत्साहात पार पडली. दरवर्षीप्रमाणे यंदाही राज्याच्या विविध भागांतून आलेल्या लाखो भीमसैनिकांनी लांडोर बंगला येथे उपस्थित राहून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन केले. मुसळधार पावसाची पर्वा न करता भीमसैनिकांचा उत्साह शिगेला पोहोचला होता. संपूर्ण परिसर 'जय भीम', 'नमो बुद्धाय' आणि 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमर राहो' अशा घोषणांनी दुमदुमून गेला. भीम स्मृती यात्रेनिमित्त सामाजिक, प्रबोधनात्मक आणि विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जळगावसह विविध जिल्ह्यांतील अनेक भंते पायी प्रवास करत लांडोर बंगला येथे दाखल झाले आणि महामानवांना अभिवादन केले. याच पार्श्वभूमीवर फाईट ग्रुप महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने भव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले. डीजेच्या तालावर आणि *'जय भीम'*च्या घोषणांमध्ये हजारो भीमसैनिक शिस्तबद्ध पद्धतीने रॅलीत सहभागी झाले. या रॅलीने शहरवासीयांचे विशेष लक्ष वेधून घेतले. या कार्यक्रमाला फाईट ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष नाना साळवे, विजय अहिरे, गोविंदा गरुड, पप्पू पगारे, सोनू विधाते, भीमा निकम, पप्पू पाटोळे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने भीमसैनिक उपस्थित होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे स्मरण, सामाजिक समतेचा संदेश आणि प्रबोधनाचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

# शेतकऱ्यांच्या कष्टाला मिळणार आर्थिक बळ; राज्यस्तरीय खरीप पीक स्पर्धा २०२६-२७ जाहीर

## ११ पिकांसाठी तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर स्पर्धा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** राज्यातील खरीप पिकांची उत्पादकता वाढविणे, आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा प्रसार करणे आणि उत्कृष्ट उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने कृषी विभागाने 'राज्यस्तरीय खरीप पीक स्पर्धा २०२६-२७' जाहीर केली आहे. जळगाव जिल्ह्यातील पात्र शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी ऑनलाईन अर्ज करून या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी यांनी केले आहे. यंदाच्या स्पर्धेत भात, ज्वारी, बाजरी, तूर, नाचणी, मूग, उडीद, मका, सोयाबीन, भुईमूग आणि सूर्यफूल अशा एकूण ११ खरीप पिकांचा समावेश करण्यात आला आहे. स्पर्धा तालुका, जिल्हा आणि राज्य अशा तीन स्तरांवर होणार असून प्रत्येक स्तरावर उत्कृष्ट उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना रोख पारितोषिक व सन्मान देण्यात येणार आहे.



### आकर्षक रोख पारितोषिके

प्रथम क्रमांकासाठी ₹५,०००, द्वितीय ₹३,००० आणि तृतीय ₹२,००० इतकी बक्षिसे देण्यात येणार आहेत. जिल्हा स्तरावर प्रथम ₹१०,०००, द्वितीय ₹७,००० आणि तृतीय ₹५,०००, तर प्रथम ₹५०,०००, द्वितीय ₹४०,००० आणि तृतीय ₹३०,००० पारितोषिके जाहीर करण्यात आली.

### पात्रता व अर्ज प्रक्रिया

स्पर्धेसाठी अर्ज प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून स्वतंत्र 'पीक स्पर्धा' पोर्टलवर अर्ज करावा लागणार आहे. स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर शेती करणारा शेतकरी पात्र असेल. एका शेतकऱ्याला एकापेक्षा अधिक पिकांसाठी अर्ज करता येणार आहे.

### क्षेत्राच्या निकषानुसार भात

पिकासाठी किमान २० गुंठे, तर इतर सर्व पिकांसाठी किमान ४० गुंठे सलग लागवड आवश्यक आहे.

### अर्ज करण्याची अंतिम मुदत

मूग व उडीद: १० ऑगस्ट २०२६
इतर सर्व पिके: ३१ ऑगस्ट २०२६

कृषी विभागाच्या मते, या स्पर्धेमुळे प्रगतिशील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्यास प्रोत्साहन मिळेल. तसेच राज्यभरातील उत्कृष्ट उत्पादक शेतकऱ्यांचा गौरव होऊन इतर शेतकऱ्यांनाही प्रेरणा मिळणार आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कुरबान तडवी यांनी सांगितले की, "जळगाव जिल्ह्यात खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन घेतले जाते. विविध प्रयोग करून उत्पादनवाढ साधणाऱ्या शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी ऑनलाईन अर्ज करून या स्पर्धेचा लाभ घ्यावा."

# रस्त्यांच्या समस्या सोडवा, अन्यथा टोल वसुली थांबवा!

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद | प्रतिनिधी :** नशिराबाद येथील तरसोद बोगद्याजवळील सर्व्हिस रोडवर मुसळधार पावसामुळे गुडघ्यापासून ते कमरेपर्यंत पाणी साचल्याने वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आहे. या गंभीर समस्येमुळे संतप्त झालेल्या नशिराबादच्या लोकप्रतिनिधींनी शुक्रवारी (दि. ३१ जुलै) रात्री थेट नशिराबाद टोल नाक्यावर धडक देत काही काळ टोल वसुली बंद पाडली. जोपर्यंत रस्त्यांच्या समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा निघत नाही, तोपर्यंत टोल वसुली खपवून घेतली जाणार नाही, असा सज्जड इशारा यावेळी देण्यात आला. गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे तरसोद बोगद्याजवळ मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. या पाण्यातून मार्ग काढताना अनेक दुचाकी वाहने बंद पडली असून किरकोळ अपघातांच्या घटनाही घडल्या आहेत. भुसावळ–सुनसगाव मार्गे मलकापूरकडे जाणाऱ्या या अत्यंत वर्दळीच्या मार्गावर पेट्रोल पंप, शाळा, महाविद्यालय आणि आयटीआय संस्था असल्याने हजारो विद्यार्थी, कामगार आणि प्रवाशांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. महामार्गावर साचलेल्या पाण्यामुळे काही एस.टी. बसेसही पर्यायी मार्गाने वळवाव्या लागल्या. नागरिकांच्या संतापाचा फटका स्थानिक लोकप्रतिनिधींना बसत असला, तरी प्रत्यक्षात या रस्त्याची देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी 'राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची' (NHAI) आहे. वारंवार पाठपुरावा करूनही एनएचएआय प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई केली जात नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप उसळला आहे. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेत नशिराबादचे नगराध्यक्ष योगेश पाटील, माजी जि.प. उपाध्यक्ष तथा नगरसेवक लालचंद पाटील, उपनगराध्यक्ष पंकज महाजन, भाजप शहराध्यक्ष तथा नगरसेवक बापू बोढरे आणि सामाजिक कार्यकर्ते विनोद रंधे यांनी नागरिकांसह रात्री सुमारे साडेनऊ वाजता टोल नाक्यावर धडक दिली. यावेळी वाहनांना विनाशुल्क मार्गस्थ करत काही वेळ टोल वसुली थांबवण्यात आली. विशेष म्हणजे, लोकप्रतिनिधींनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संबंधित अधिकाऱ्यांनी आपले मोबाईल फोन स्विच ऑफ केल्यामुळे संतापात आणखी भर पडली. या सर्व घटनाक्रमाची माहिती दूरध्वनीवरून मंत्री गिरीश महाजन यांना देण्यात आली. त्यांनी तात्काळ जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून वस्तुस्थितीची माहिती दिली.